पियुषचे हे प्रपोज़ल ऐकून रूही चकितच झाली. इतक्या वर्षांनी भेटल्यानंतर इतर काही बोलण्याआधी व्यवसायाचे रुक्ष आणि नीरस बोलणे काढणारा पियुष कसा असेल असाही एक विचार रूहीच्या मनात येऊन गेला. लगेच उत्तर न देता तिने दार लावले व ती दिवाणखान्यातील काउचकडे वळली. तिला आठवले तिच्या आणि पियुषच्या तास न् तास चालणाऱ्या गप्पा. काउचच्या एका कोपऱ्यात ती आणि दुसऱ्या कोपऱ्यात पियुष बसून त्यांच्या गप्पा चालत. काउच तसा लहान, तेव्हा त्यांचे पाय किंवा गुडघे खूप जवळ असत. एक विशिष्ट तऱ्हेची जवळीक किंवा इंटिमसी त्यांना त्या बैठकीतून मिळत असे. तिच्या अंगातून एक गोड शिरशिरी उठली. काउचच्या एका कोपऱ्यात पूर्वीसारखेच बसून तिने पियूषकडे पाहिले. त्याला तिच्या मनातील भाव कळला असावा. एक दीर्घ निःश्वास टाकून तो काउचच्या दुसऱ्या कोपऱ्यात बसला. दोघांचे पाय आणि गुडघे समीप होते. एक उबदार फीलिंग तिच्या मनात दाटून आले. आपल्या हातांना मांडीवर स्थिर ठेवत ती म्हणाली, “ तर आता तुला माझ्या बंद होऊ घातलेल्या बुटीकमधील स्टॉक हवा आहे. मी विचारू शकते का ह्या मेहेरबानीचे कारण? "

पियूषचे घारे डोळे रागाने चमकले. तिच्याकडे स्थिर नजरेने पहात तो म्हणाला, “ तर, फारसे काही बदलले नाही म्हणायचे! तोच तुटक स्वभाव, तीच गोष्टींना assume करून विपरीत अर्थ काढायची रीत. मला वाटलं होतं की यशाने आणि अडचणींमुळे तू थोडी तरी सौम्य झाली असशील.”

रूही थोडीशी वरमली. ती म्हणाली, ” तसे नाही रे. मी ना सध्या खूप तणावाखाली आहे. आयुष्याचे स्वप्न पूर्ण व्हायच्या भरात असतानाच ही विचित्र अडचण आली आणि मी अगदी गोंधळून गेले आहे. तुझा अपमान करायची माझी इच्छा नव्हती. I am very sorry! “

तिचा हात पुढे होऊन आपल्या हातात घेऊन तो म्हणाला, “ ते जाऊ दे. मला हे सांग की तुझा आता प्लॅन काय आहे? आय कॅन हेल्प यू. आय वॉंट टू हेल्प यू.”

रूहीने आपला हात पियूषच्या हातातून हलकेच सोडवून घेतला आणि ती म्हणाली, “ तू मला विसरला नाहीस मी नकार दिला तरी? होतास तरी कोठे इतके दिवस? ”

“ काही गोष्टी विसरण्यापलीकडच्या असतात, रूही! काही जखमा भरून येत नाहीत कधीच. तू तेव्हा नकार दिलास तरी तुझी जागा माझ्या मनात तशीच राहिली. दुसरे कोणीच त्याजवळ कधी पोहोचू शकले नाही त्या प्रकारानंतर माझे भारतात रहायला मनच करत नव्हते. मी नोकरीनिमित्त खूप फिरलो. युरोप, यूके मध्ये दिवस काढले. भरपूर पैसा

कमावला. आणि आता ह्या नवीन mall डेवेलपमेंटचा CEO म्हणून मी सूत्रे हाती घेतली. पण ते जाऊ दे. तुझ्या लंडनच्या कंपनीशी टाय-अपचे काय झाले? Is it finalized? " रूहीने त्याच्याकडे चमकून पाहिले. " तुला कसे माहीत आहे हे?" आपल्याशीच हसून ती म्हणाली," कळले बरं, लंडन कनेक्शन्स?"

पियुष मनापासून हसला. तो म्हणाला, " अगं, मी इतका फिरलो तरी तुझ्या 'dream unlimited' वर लक्ष ठेऊन होतो बरं. मला माहीत आहेत तुझी स्वप्ने. आणि अडचणी पण. म्हणून तर मी इथे आलो तुला परत भेटायला." एक दीर्घ निःश्वास सोडून रूही म्हणाली," मी तुझा असा अपमान तेव्हा केला त्याचा राग नाही आला का तुला? आपुलकी इतकी वर्षं टिकते का रे! आणि माझे म्हणशील तर मी ते सर्व केव्हाच विसरून गेले. माझी स्वप्नेच मला पुरेशी सोबत करतात."

तिच्याकडे एकटक पहात पियुष म्हणाला," तुला ते हृदयनाथ मंगेशकरांनी म्हटलेले गाणे आठवते? आपण एकत्र ' भावसरगम ' कार्यक्रम पाहिला तेव्हा आपल्याला आवडलेले?"

भावूक होऊन ती म्हणाली," हाती धनुष्य ज्याच्या, त्याला कसे कळावे, हृदयात बाण ज्याच्या, त्यालाच दुःख ठावे!"

पियुष हसून म्हणाला, " पण हे बाण फक्त प्रेमाचेच नसतात बरं. मला थोडीशी कल्पना आहे तुझ्या स्वभावाची आणि तू लहानपणी कशी वाढलीस त्याची. तुला मी कमी महत्त्वाकांक्षी, नेभळट वाटलो. तू कधी विचार केलास का की तुला कोणीच पुरुष आत्तापर्यंत आपला जोडीदार असावा असे वाटले नाही. तुझी जोडीदाराची व्याख्या खूप कठीण आहे. Can you think, who you are comparing with when you look at your mate?"

पियुषचा हा साधा प्रश्न तिला एकदम धक्का देऊन गेला. खरंच आपण आपल्या जोडीदाराच्या अपेक्षा कुठल्या फूटपट्टीने मोजत आहोत? असा कोण पुरुष आपल्या मनावर असा खोल ठसा उमटवून गेला आहे की दुसरे कोणीच आपल्याला त्या प्रतिमेशी मॅच होताना दिसत नाही?

पियुष तिच्याकडे पहात म्हणाला, " पटतंय का? विचार कर. तुझ्या वडिलांशी तुझं कधीच फारसं पटलं नाही. पण तू त्यांचीच कार्बन कॉपी आहेस काही बाबतीत. तीच धडाडी, तशीच मोठी स्वप्ने, तोच हेकट स्वभाव आणि स्वतः ला सर्वांपेक्षा निराळे समजायची वृत्ती. No one Can beat your dad's image in your mind, Ruhi!"

रूहीच्या डोळ्यात पाणी आलं. तिच्या विक्षिप्त वागणुकीचा तिला उलगडा झाला. ज्या आपल्या वडिलांच्या स्वभावापासून तिला दूर जायचे होते त्याच स्वभावाने तिला ‘programmed’ करून टाकले होते हे तिला कळले.

ती म्हणाली,” थँक्यू पियुष. तुझे आभार कसे मानू तेच कळत नाही. I am my dad’s girl! That is true! पण आता खूप उशीर झाला आहे मला बदलायला. मला माझी स्वप्नेच पुढे नेणार आहेत. आणि त्याकरिता मला माझ्या वडिलांच्या रुथलेस स्वभावाचीच गरज आहे. मला तू आवडतोस. तुझी प्रगती आणि प्रगल्भता पाहून मी चकित झाले आहे. You are my best friend. पण मला माझ्या स्वभावाच्या गावाला जाणारी वाट स्वतः लाच हुडकून काढायची आहे. ही वाट भले दूरची असेल पण माझ्या स्वप्नांची आहे.“

पियुष तिच्याकडे पहात म्हणाला, “ हं, मला याचीच भीती होती. रूही, तू एक स्वयंप्रज्ञ माणूस आणि त्यातून स्त्री आहेस. तुझी वाट तू हुडकशीलच पण एक लक्षात ठेव, तुला मदतीला तयार असणाऱ्या माणसांची कमी नाही. तू केवळ मदत घ्यायला तयार हवीस. आणि दुसरं म्हणजे; आत्ता पण माझी बस चुकलीच म्हणायची!”

पियुषच्या ह्या अर्धवट विनोदी, अर्धवट दुःखी कॉमेंटकडे तिच्या नेहमीच्या स्टाइलमधे दुर्लक्ष करत रूही जागेवरून उठली. पियुषला म्हणाली, “तर मग उठा साहेबजी! आता मला दामले वकिलांच्या मागे लागून त्या डेमॉलिशनला स्थगिती मिळवलीच पाहिजे. आधी त्यांची भेट घेते. मग fax to london office. नंतर मोर्चा भैरवीकडे. तिच्या बुटीकमधे ती माझा स्टॉक काही दिवस display करू शकेल. आणि हो, आमच्या सध्याच्या जागेतील भाडेकरुंचा एक मोर्चा पण काढूया त्या बिल्डरच्या ऑफीसवर. मग कळेल त्याला ह्या भानगडीची किंमत.”

रूही कडे अनिमिष नजरेने पहात पियुष उठला. रूहीने त्याचा हात हातात घेत म्हटले, “ आणि या सगळ्यातून वेळ मिळाला तर मला तुझी mall ची कल्पना समजावून सांगशील का? मीच तुझ्या त्या mall मधे एक बुटीक काढेन. मग माझ्या स्टॉकची तुला अजिबात काळजी नको. माझ्या स्वप्नांची दूरची वाट तुझ्या mall च्या बाजूने जात असेल. कदाचित माझी स्वप्ने तुझ्या स्वप्नांना पण भेटतील या वाटेवर – कोण जाणे! Let’s go!”